


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : २५४ वा शुक्रवार दि१९ डिसेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# कोकाटेंची गच्छंती, कोणाला संधी? अजितदादा एका दगडात दोन पक्षी मारायच्या तयारीत; मुंडेंना धक्का?

वृत्तसंस्था/मुंबई

शासकीय सदनिका लाटल्याप्रकरणी नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाकडून २ वर्षे तुरुंगवासाची आणि १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आलेल्या माणिकराव कोकाटे यांची अखेर मंत्रिमंडळातून गच्छंती झालेली आहे. माणिकराव कोकाटे यांच्याकडे असलेली खाती कालच काढून घेण्यात आलेली होती. अटकेला स्थगिती मिळवण्याचे प्रयत्न कोकाटे यांच्याकडून सुरु होते. या प्रकरणात उद्या मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी आहे. पण त्याआधीच कोकाटे यांनी राजीनामा दिला आहे. त्यामुळे त्यांच्या जागी कोणाची वर्णी लागणार याबद्दल उत्सुकता आहे. कोकाटे अडचणीत आलेले असताना माजी मंत्री धनंजय मुंडे काल दिल्लीत गेले होते. त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहांची भेट घेतली. मुंडे मंत्रिपदासाठी लॉबिंग करत असल्याची चर्चा सुरु झाली. विशेष म्हणजे मुंडे हे फडणवीस सरकारमधून राजीनामा द्यावा लागलेले पहिले मंत्री आहेत. राज्यात गेल्या वर्षीच्या अखेरीस निवडणूक झाली. महायुती सत्तेत कायम राहिली. मुख्यमंत्रिपदी देवेंद्र फडणवीस यांची वर्णी लागली. पण त्यानंतर काही दिवसांत मुंडे अडचणीत आले. बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या प्रकरणात मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराडला अटक झाली. मुंडे यांच्यावरही गंभीर आरोप झाले. अखेर अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान त्यांनी राजीनामा दिला. आता धनंजय मुंडे पुन्हा एकदा मंत्रिपदासाठी उत्सुक आहेत. काल ते अमित शहांच्या भेटीसाठी दिल्लीला गेले. याबद्दल दिल्लीतच असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना विचारणा करण्यात आली. मुंडे इथे आहेत हे मला माहीत नाही. त्यांचे हायकमांड तर मुंबईत आहेत. मग ते इथे काय करतात ते आम्ही त्यांना विचारु, अशी प्रतिक्रिया तटकरेंनी दिली. सोबतच विरोधकांचा मुंडे यांना पुन्हा मंत्रिपद देण्यास ठाम विरोध आहे. त्यामुळे मुंडे यांची मंत्रिमंडळात वर्णी लागण्याची शक्यता धूसर होते. धनंजय मुंडे मराठवाड्यातून येतात. ते वंजारी समाजाचे आहेत. मुंडे यांच्या गच्छंतीमुळे सध्या अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील एकही मंत्री मराठवाड्यातील नाही. कोकाटे मराठा समाजाचे आहेत. ते नाशिकमधून येतात. उत्तर महाराष्ट्रातून कोकाटे यांच्यासह छगन भुजबळ आणि नरहरी झिरवळ मंत्रिमंडळात संधी देण्यात आली. पैकी कोकाटेंनी राजीनामा दिला आहे. मराठा असलेल्या कोकाटे यांच्या जागी अन्य मराठा नेत्याला संधी देऊ शकते. परभणीच्या पाथरी मतदारसंघाचे आमदार राजेश विटेकर मंत्रिपदाच्या



शर्यतीत आहेत. विटेकर यांना संधी दिल्यास मराठा आणि मराठवाडा ही दोन्ही समीकरणं साधली जातात. त्यामुळे एकाच दगडात दोन पक्षी मारले जातात. विशेष म्हणजे खुद्द विटेकर यांनीदेखील पक्ष नेतृत्वाकडे तशी मागणी केलेली आहे. मंत्रिपदासाठी आपला विचार व्हावा, अशी विनंती विटेकर यांनी आधीच केलेली आहे.

# पुण्यात भाजपचं मिशन १२५; शिंदेंच्या शिवसेनेला स्पष्टच सांगितलं; युतीच्या पहिल्या बैठकीत काय झालं?

वृत्तसंस्था/ पुणे

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरात महायुतीमधील जागावाटपाच्या हालचालींना वेग आला आहे. गुरुवारी भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या नेत्यांमध्ये एक महत्त्वाची प्राथमिक बैठक पार पडली. या बैठकीत ठरलेल्या सूत्रानुसार, भाजपने मागील निवडणुकीत विजय मिळवलेल्या १०५ जागांवर कोणतीही चर्चा न करता, त्या जागा स्वत:कडेच ठेवण्याचे धोरण निश्चित केले आहे. यामुळे आता केवळ विरोधकांच्या ताब्यातील जागांवरच दोन्ही पक्षांत वाटाघाटी होणार आहेत. या नव्या सूत्रामुळे शिवसेनेच्या वाट्याला पुणे शहरात केवळ २० ते २२ जागा मिळण्याची शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे. भाजपने शिवसेनेला आपला सविस्तर प्रस्ताव मांडण्यास सांगितलं असून, मागील वेळी दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या पक्षाला प्राधान्य देण्याचंही प्राथमिक स्तरावर ठरलं आहे. सध्या शिवसेनेकडे माजी नगरसेवकांचे संख्याबळ फक्त नाना भानगिरे यांच्या रूपाने एकच असल्याने त्यांच्यासाठी जागांची ओढाताण होण्याची चिन्हे आहेत. या बैठकीत भाजपच्या वतीने केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मंत्री चंद्रकांत पाटील, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, माधुरी मिसाळ आणि शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी सहभाग घेतला. तर शिवसेनेकडून उपसभापती नीलम गोऱ्हे, आमदार विजय शिवतारे आणि शहरप्रमुख प्रमोदनाना भानगिरे उपस्थित होते. चर्चेदरम्यान भाजप नेत्यांनी स्पष्ट केलं की, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यातील जागा जिंकण्यासाठी भाजपने मेगाभरतीचे नियोजन केलं असून अनेक विरोधी नेते भाजपच्या संपर्कात आहेत. त्यामुळे भाजप मिशन १२५ घेऊन जात असल्यामुळे १२५ जागांच्या पुढेच युतीमध्ये जागा वाटपाची चर्चा केली जाईल, असं स्पष्ट या बैठकीत भाजप नेत्यांनी सांगितल्याची माहिती आहे. जागावाटपाच्या या प्रक्रियेबाबत माहिती देताना खासदार मुरलीधर मोहोळ म्हणाले की, युतीच्या दृष्टीने ही चर्चा अतिशय सकारात्मक झाली असून काही विशिष्ट प्रभाग आणि नावांवर प्राथमिक विचारमंथन झालं आहे. येत्या एक-दोन बैठकांमध्ये जागांच्या वाटपावर पूर्णपणे एकमत होईल आणि त्यानंतरच महायुतीची अधिकृत घोषणा केली जाईल, असंही त्यांनी स्पष्ट केलं. दुसरीकडे, शिवसेनेचे आमदार विजय शिवतारे यांनी सांगितलं की, प्राथमिक स्तरावरील बाबींवर सविस्तर चर्चा झाली



असून, विशेषतः मागील वेळी विरोधकांनी जिंकलेल्या ५० जागांच्या वाटपावर अधिक लक्ष केंद्रित केलं जाणार आहे. उमेदवार ठरवताना दोन्ही पक्षांची सहमती आणि निवडून येण्याची क्षमता हाच एकमेव निकष लावला जाईल, असंही शिवतारे यांनी नमूद केले. पुढील काही दिवसांत होणाऱ्या बैठकीनंतर या जागावाटपाचे अंतिम चित्र स्पष्ट होईल.

# ब्रह्मोसची आत्मनिर्भर भरारी

पाकिस्तानात इस्लामाबादपासून १० किलोमीटरवर असलेल्या चकलाला येथील नूर खान हवाई तळावर पाकचे बरेचसे लष्करी बळ एकवटलेले होते. लष्करी कारवायांचे केंद्र, लढाऊ विमाने, व्हीआयपींची वर्दळ, विमानांचा इंधनभरणा, वायुवीरांचे प्रशिक्षण हे सारे याच तळावर होते. भारतापासून सुमारे ४०० किलोमीटरवर असलेल्या या महत्त्वाच्या तळावरील धावपट्टी, बंकर, हँगर भारतीय क्षेपणास्त्राने १० मे २०२५ रोजी उद्ध्वस्त केले. नूर खान तळाला इतका मोठा हादरा देणे, हे ऑपरेशन सिंदूरमध्ये भारतासाठी गेमचेंजर ठरले. ङ्ग्या आक्रमक खेळीमध्ये भारतीय संरक्षणदलाच्या भात्यातले सर्वात महत्त्वाचे अस्त्र होते, ते म्हणजे सुखॉय एमके १ विमानांवरून डागलेले ब्रह्मोस हे स्वदेशी क्षेपणास्त्रफ, अशा शब्दांत संरक्षण सामग्रीविकास संशोधन संस्थेचे (डीआरडीओ) अध्यक्ष समीर कामत यांनीही या माहितीस नुकताच दुजोरा दिला होता. मॅक २.८ ते ३.५ इतक्या सुपरसॉनिक म्हणजे ध्वनिपेक्षाही तिप्पट अधिक वेगाने, तासाला साधारण साडेतीन हजार किलोमीटर इतक्या वेगाने मार्गक्रमणा करणारे हे क्षेपणास्त्र गेली २५ वर्षे विकसित होत होते आणि त्याच्या सिद्धतेची प्रचीती या हायटेक रणांगणावर आली होती. इराकच्या आखाती युद्धात अमेरिकेने टोमोहॉक या सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्रांचा प्रभावी वापर केला होता, त्यानंतर त्यापेक्षा शक्तिशाली, प्रगत क्षेपणास्त्राची प्रत्यक्ष रणभूमीवरील चाचणी कुठे झाली नव्हती. ब्रह्मोस क्षेपणास्त्र व अन्य हवाई संरक्षण प्रणालींच्या वापरातून भारताने पाकिस्तानच्या ११ हवाई तळांवर प्रहार चढविला व त्यामुळे पाकची चांगलीच कोंडी झाली. साहजिकच प्रत्यक्ष रणांगणावरच्या सिद्धतेमुळे ब्रह्मोसच्या निर्यातीच्या आशा अधिक प्रमाणात पल्लवित झाल्या. संभाव्य ग्राहकदेशांमध्ये या उत्पादनाबाबत विश्वास निर्माण झाला. ब्रह्मोस क्षेपणास्त्र निर्यात करायचे, तर त्याचे उत्पादनही तितक्या प्रमाणात व वेगाने व्हायला हवे. त्यादृष्टीने गेल्या आठवड्यात एक महत्त्वाचे पाऊल पडले, ते म्हणजे लखनऊ येथील नव्या कारखान्यातून अवघ्या पाच महिन्यांत ब्रह्मोसच्या पहिल्या तुकडीचे लोकार्पण करण्यात आले. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. ३८० कोटी रुपये खर्चून २०० एकर परिसरात उभारण्यात आलेल्या या सुविधेतून वर्षाला ८० ते १०० ब्रह्मोस क्षेपणास्त्रांची निर्मिती होणार आहे. त्याद्वारे ३ हजार रोजगार तयार झाले आहेत. भारतीय संरक्षण संशोधन विभाग, सैन्यदले, उद्योगक्षेत्र व वैज्ञानिक यांच्या सहयोगातून ब्रह्मोसचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प साकारला असून मिसाइलमॅन म्हणून परिचित झालेले भारताचे माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची दूरदृष्टी व निर्धार यांचे ते फळ आहे. ऑपरेशन सिंदूरने ब्रह्मोसच्या उपयुक्ततेवर शिक्कामोर्तब झाले. मुळात एखाद्या संरक्षणदलात क्षेपणास्त्राचे महत्त्व काय असते, ते जाणून घ्यायला हवे. ड्रोन, विमाने, पाणबुड्या यावरील तोफा, बंदुका यांच्यातील पारंपरिक शस्त्रे-दारूगोळा जिथे पोहोचू शकत नाहीत, तिथे शत्रूच्या माऱ्यापासून दूर राहून प्रहार करण्याचे बळ क्षेपणास्त्रामुळे येते. एखादा लष्करी किंवा हवाई तळ उद्ध्वस्त करायचा, तर तितकाच शक्तिशाली दारूगोळा हवा. ते शस्त्र इतके चपळ हवे की, शत्रूच्या कोणत्याही टेहळणी प्रणालीच्या कचाट्यात ते येऊ नये. ब्रह्मोसकडे हे सारे होते. वर उल्लेख केलेला स्वनातीत वेग, त्याची लक्ष्यक्षेदातील अचूकता, म्हणजेच एकाच माऱ्यात अचूक लक्ष्यभेदाची हमी देणारी प्रणाली, २०० ते ३०० किलोग्रॅम दारूगोळा वाहून नेण्याची क्षमता आणि सध्या सुमारे ३०० किलोमीटरपर्यंतचा पल्ला ही ब्रह्मोसची वैशिष्ट्ये ठरली आहेत. भारतातील ब्रह्मपुत्रा आणि रशियाची मोस्क्वा या दोन नद्यांच्या नावावरून नव्वदीच्या दशकांत या क्षेपणास्त्राचे नामकरण झाले. भारताच्या डीआरडीओने प्रथम जहाजविरोधी माऱ्यासाठी निर्मिलेल्या या क्षेपणास्त्राच्या कक्षा उत्तरोत्तर विस्तारत गेल्या. प्रथम सन २००० मध्ये चांदीपूरमधून जमिनीवरून मारा करणाऱ्या ब्रह्मोसची चाचणी घेण्यात आली. त्यानंतर २००८ मध्ये आयएनएस रणवीर या विनाशिकेवरून त्याची चाचणी घेण्यात आली. नागरी समाज संस्थांच्या आदर्श कार्यांमध्ये सेवा तरतूद, जनउत्थान, धोरणात्मक वकिली आणि विकास, उत्तरदायित्व आणि पारदर्शकता सुनिश्चित करणे, जनजागृती करणे, मानवी हक्कांचे संरक्षण, सामाजिक संघर्ष निराकरण, निवडणुकांवर देखरेख ठेवणे इत्यादी महत्त्वपूर्ण पैलूंचा समावेश असतो. या सगळ्या गोष्टी करीत असताना नागरी समाज संस्थानी राष्ट्राच्या सर्वांगीण विकासास मदत करण्यासाठी एक नियमाधारित संस्था म्हणून कार्य करणे अपेक्षित आहे. परंतु बहुसंख्य खरोखरच तसे कार्य करतात का, हा प्रश्न पडतो व म्हणूनच त्या काय करतात हे खोलात जाऊन तपासणे गरजेचे आहे. जगभरातील नागरी समाज संस्था या नियम आणि कायदे यांच्या संचाद्वारे चालविल्या जातात. भारतानेही नागरी समाज संस्था आणि स्वयंसेवी संस्था (एनजीओ) यांचे नियमन करण्यासाठी कायदेशीर चौकट निश्चित केली आहे. त्या नियमांनुसार, अशा संस्थांची नोंदणी ऐच्छिक आहे. परंतु भारतात शाखा स्थापन करणाऱ्या कोणत्याही परदेशी संस्थेसाठी किंवा भारत किंवा परदेशातील फाउंडेशन, सरकार किंवा कंपनीकडून अनुदान घेणाऱ्या कोणत्याही संस्थेसाठी नोंदणी अनिवार्य आहे. एफसीआरए (विदेशी चलन नियमन कायदा) अंतर्गत नोंदणीकृत कोणत्याही नागरी समाज संस्था किंवा अशासकीय संस्था यांची नोंदणी काही विशिष्ट अटींच्या अधीन राहून रद्द करण्याचा अधिकार भारत सरकारला आहे. भारतात अनेक नागरी समाज संस्था आज कार्यरत आहेत. आणि या संस्थांमधील काही संस्था या खरोखर उत्कृष्ट कार्य करीत आहेत. त्यात युनायटेड नेशन्स एजन्सीज, सेंटर फॉर सिव्हिल सोसायटी, नॅशनल एनजीओ आदी संस्थांचा समावेश आहे. त्याचवेळी काही संस्था विहित नियमांचे सर्रास उल्लंघन करताना आढळतात. अशा काही प्रमुख संस्थांमध्ये ऑक्सफॅमच्या शैक्षणिक व इतर स्वयंसेवी संस्था, ॲम्नेस्टी इंटरनॅशनल सेंटर फॉर पॉलिसी रिसर्च आदी संस्थांचा समावेश आहे. आपल्याकडे १२०पेक्षा जास्त नागरी समाज संस्था / स्वयंसेवी संस्थांवर त्यांच्या भारतविरोधी कारवायांसाठी बंदी घालण्यात आली आहे आणि ६८०० पेक्षा जास्त नागरी समाज संस्था/स्वयंसेवी संस्था या परदेशी निधीचा गैरवापर केल्यामुळे आणि कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन केल्यामुळे सरकारच्या देखरेखीखाली आहेत. नागरी समाज संस्थेच्या गैरवापराचा सर्वांत महत्त्वाचा पैलू म्हणजे ङ्गडीप स्टेट ॲक्टर्सफ तंत्रज्ञानाच्या आगमनाबरोबर डीप स्टेट ॲक्टिव्हिटी एखाद्या परकीय देशाद्वारे किंवा परकीय देशांच्या गटाद्वारे (प्रायोजक गट) स्थानिक राजकीय गट किंवा व्यक्ती, संघटना, प्रसारमाध्यमे इत्यादींच्या सहकार्याने लक्ष्यित देशाला अस्थिर करण्यासाठी किंवा तेथे सत्ताबदल घडवून आणण्यासाठी केल्या जातात. सरकारचे नेतृत्व करणाऱ्या नेत्याविरोधात डीप स्टेट बदनामीच्या मोहिमा राबवते, त्याला हुकूमशाहा, हिटलर, सत्तेची भूक असणारा असे संबोधते. अशा वाईट प्रकारे तयार केलेल्या मोहिमांना प्रायोजक गटाकडून पेड फॉर मास मीडिया, नाममात्र नागरी तपास संस्था, पेड फॉर लोकल ग्रुप, फंडेड सीएसओ / स्वयंसेवी संस्था इत्यादींच्या वापराद्वारे समर्थन दिले जाते.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मी त्याला संपवलं; लिव्ह पार्टनरचा जीव घेतला, दोन मुलींसह पाच तास बॉडीजवळ बसून, कारण काय?

**लखनौ :** उत्तर प्रदेशची राजधानी लखनौ एक खळबळजनक घटना समोर आली आहे. येथे लिव्ह इनमध्ये राहणाऱ्या एका इंजिनिअरची त्याच्या पार्टनरनेत हत्या केली आहे. हत्या केल्यानंतर आरोपी महिला तिच्या मुलींसह अनेक तास मृतदेहासोबत बसून होती. त्यानंतर तिने स्वत: या हत्येची माहिती पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी मृतदेह ताब्यात घेतला आणि आरोपी महिलेला अटक करण्यात आली. अभियंत्याच्या कुटुंबाच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी महिलेच्या दोन अल्पवयीन मुलींविरुद्धही एफआयआर दाखल केला आहे. पोलिसांनी शवविच्छेदनानंतर मृतदेह कुटुंबाकडे सोपवला आहे आणि प्रकरणाचा तपास सुरू करण्यात आला आहे.लखनौच्या सालारगंज शिवम ग्रीन सिटीमध्ये इंजिनिअरसोबत लिव्ह-इनमध्ये



राहणाऱ्या प्रेयसीने रविवारी रात्री चाकूने भोसकून त्याची हत्या केली. त्यानंतर सकाळी तिने फोनवरुन पोलिसांना हत्येची माहिती दिली. पोलिसांनी तिला अटक केली आहे. तरुणाच्या वडिलांनी प्रेयसी आणि तिच्या दोन्ही मुलींविरुद्ध हत्येचा एफआयआर दाखल केला आहेपोलिसांनी सांगितले की, सुरुवातीच्या चौकशीत महिलेने पोलिसांना सांगितले की, तिचा लिव्ह-इन पार्टनर अनेक दिवसांपासून तिच्या मोठ्या मुलीवर वाईट नजर ठेवून होता. तो मुलीचा विनयभंग करण्याचा प्रयत्नही करत होता. ज्यामुळे त्यांच्यात वारंवार भांडणं होत होती.

रविवारी रात्री महिलेने तिच्या मुलींच्या मदतीने स्वयंपाकघरातील चाकूने त्याचा गळा चिरुन त्याची हत्या केली, असा दावा करण्यात आला आहे.

जानकीपुरम सेक्टर एच येथील रहिवासी नरेंद्र सिंग यांचा एकुलता एक मुलगा सूर्य प्रताप सिंग (३२) हा एव्हरेडीमध्ये कार्यकारी अभियंता होता. डीसीपी पूर्व शशांक सिंग यांनी सांगितले की, सूर्य प्रताप गेल्या चार वर्षांपासून सालारगंज शिवम ग्रीन सिटी येथील त्याच्या दुसऱ्या घरात रत्ना (४६) सोबत लिव्ह इनमध्ये राहत होता. हरदोई येथील रहिवासी असलेल्या रत्नाला तिच्या माजी नवऱ्यापासून १७ आणि १५ वर्षांच्या दोन मुली आहेत. सोमवारी रात्री रत्ना आणि सूर्य प्रतापमध्ये कशावरून तरी भांडण झाले. पहाटे ५ वाजताच्या सुमारास रत्नाने घरात ठेवलेल्या चाकूने सूर्य प्रतापचा गळा चिरला. त्यामुळे अतिरक्तस्राव होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. त्यावेळी रत्नाच्या दोन्ही मुलीही घरात उपस्थित होत्या. हत्येनंतर आरोपी महिलेने पोलिसांना घटनेची माहिती दिली. बीबीडी पोलिस ठाण्यातील पोलिसांनी घटनास्थळी येऊन रत्नाला अटक केली. घटनेतील मुलींच्या भूमिकेचा पोलिस तपास करत आहेत. नरेंद्र यांनी आरोप आहे की, रत्नाने तिच्या मुलींसह घर बळकावण्याच्या उद्देशाने त्यांच्या मुलाची हत्या करण्याचा कट रचला.हत्येनंतर रत्ना आणि तिच्या दोन्ही मुली साडेपाच तास घरातच सूर्य प्रताप सिंगच्या मृतदेहासोबत राहिल्या. त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न

## पहिलाच गुन्हा अनब पश्चातापही; चार दिवस रोज तीन तास

**पुणे :** मद्यधुंद अवस्थेत किंवा नशेच्या अंमलाखाली सार्वजनिक ठिकाणी अथवा अतिक्रमण करून गोंधळ घालणाऱ्यांविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५५ नुसार गुन्हा दाखल केला जातो. हा गुन्हा जामीनपात्र व अदखलपात्र असून, न्यायालयात तो सिद्ध झाल्यास आरोपीना चोवीस तासांपर्यंत साधा कारावास किंवा एक हजार रुपयांपर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षा किंवा समुदाय सेवेची (कम्युनिटी सर्व्हिस) शिक्षा होऊ शकते.

मद्यपान करून सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालणाऱ्या दोघांना तुरुंगवासाऐवजी समाजसेवा करण्याची शिक्षा पुणे न्यायालयाने सुनावली. भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५५ अंतर्गत दोन्ही आरोपींना एकूण चार दिवस दररोज तीन तास समाजसेवा करण्याचा आदेश अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी विक्रम सिंह भंडारी यांनी दिला.दोन्ही आरोपींनी शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ



निरीक्षकांच्या देखरेखीखाली समाजसेवा करावी. त्यामध्ये अधिक रहदारीच्या ठिकाणी वाहतूक पोलिसांना नियमनात मदत करणे, पोलिस ठाण्यात स्वच्छता मोहिमेत सहभागी होणे अथवा प्रोबेशन अधिकाऱ्यांनी नेमलेली नागरी कर्तव्ये पार पाडणे यापैकी अधिकाऱ्यांनी दिलेले योग्य काम त्यांना करावे लागणार आहे. किरकोळ गुन्हे करणाऱ्या आरोपींना शिक्षेऐवजी त्यांच्या सुधारणेवर आणि पुनर्वसनावर भर देणारा हा निकाल अतिशय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.दोन आरोपींना मद्याच्या नशेत शिवाजीनगर परिसरात सार्वजनिक ठिकाणी गोंधळ घालताना पोलिसांनी नोव्हेंबर महिन्यात पकडले.

## बाळाला चक्क नदीत, आई-वडील अटकेत

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर ग्रामीण परिसरातून हादरवून टाकणारी एक हृदयद्रावक घटना उघडकीस आली असून, उपचार करूनही बाळ बरे होत नसल्याच्या कारणावरून तीन महिन्याच्या बालकाला नदीत फेकून देण्यात आल्याचे धक्कादायक उघड झाले आहे. या प्रकरणात पोलिसांनी निर्दयी आई-वडिलांसह त्यांना मदत करणाऱ्या तिसऱ्या व्यक्तीला अटक केली आहे. सर्व आरोपी जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील आहेत.

४ डिसेंबर रोजी संगमनेर तालुक्यातील आंबीखालसा परिसरातील मुळा नदीकाठी एका बाळाचा मृतदेह आढळून आला. प्रथम दर्शनी संशयास्पद परिस्थिती असल्याने हा घातपात असावा असा पोलिसांचा अंदाज होता. यानंतर पोलिस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेने तपास सुरू केला.घटनास्थळी असलेल्या पुलावरून गेलेल्या वाहनांची माहिती घेतली असता एक संशयास्पद कार जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील असल्याचे समोर आले. तात्काळ पोलिसांनी कार शोधून काढली.

## इन्स्टावर ओळख ते थेट जंगलात; अल्पवयीन मुलीसोबत प्रकार

**रायगड :** अमुलकुमार जैन: म्हसळा तालुक्यातील देवघर परिसरात अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची संतापजनक घटना उघड झाली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, मुलांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. सोशल मीडियावरील ओळख अतिशय भयंकर वळण घेऊन भीषण गुन्ह्यात परिवर्तित झाली आहे.

मुरुड येथील एका तरुणाने इंस्टाग्राम वरून अल्पवयीन मुलीसोबत परिचय सुरू केला. सुरुवातीला साध्या गप्पांच्या माध्यमातून संवाद वाढत गेला; मात्र आरोपीने हळूहळू मुलीला मानसिकदृष्ट्या दडपणात ठेवण्याचे प्रयत्न सुरू केले. मुलगी भेटण्यास तयार नसल्याने आरोपीने तिच्या आईला ठार मारण्याची धमकी दिली. भीतीच्या छायेत मुलगी दबावाखाली जाण्यास भाग पडली.वारंवार नकार दिल्यानंतरही आरोपीने मुलीवर दबाव वाढवत तिला धमकावले. ङ्गनाही आलीस तर तुलाही मारून टाकीनङ्घ अशा धमक्या दिल्यानंतर आरोपीने तिला जंगल परिसरात नेऊन लैंगिक अत्याचार केला. घटनेनंतर मुलगी सायंकाळी घरी परतली. तिच्या चेहऱ्यावरचे दुःख, भीती आणि अस्वस्थता पाहून आईने चौकशी केली तेव्हा सर्व सत्य बाहेर आले आणि कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.मुलीच्या पालकांनी तातडीने म्हसळा पोलीस ठाण्यात धाव घेत औपचारिक तक्रार नोंदवली. तक्रार मिळताच म्हसळा पोलिसांनी विशेष पथक तयार करून आरोपीविरुद्ध तपास सुरू केला आणि अवघ्या दोन तासांत आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आले. या जलद कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या संपूर्ण कारवाईचे मार्गदर्शन जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे आणि म्हसळा पोलीस ठाण्याचे निरीक्षक रवींद्र पारखे यांनी केले. आरोपीवर झजउडज कायद्यासह अन्य गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सिद्धेश्वर एक्सप्रेसमधून साडे पाच कोटींचं सोनं गायब

**कल्याण :** लोकल ट्रेनमध्ये किंवा मेल एक्सप्रेसमध्ये चोऱ्या झाल्याच्या अनेक घटना आतापर्यंत समोर आल्या आहेत. पण नुकतीच मेल एक्सप्रेसमधील चोरीची अशी घटना समोर आली आहे, ज्यासाठी पोलिसांची तीन पथकं तैनात करण्यात आली आहे. सोलापूर - मुंबई मार्गावरील सिद्धेश्वर एक्सप्रेसमध्ये या कोट्यवधींच्या चोरीची घटना घडली आहे.सिद्धेश्वर एक्सप्रेसच्या एसी ए- १ कोचमध्ये प्रवास करणाऱ्या एका प्रवाशाच्या लॉक केलेल्या ट्रॉली बॅगमधून जवळपास ५ किलो वजनाचं सोनं चोरी झालं. या सोन्याची रक्कम अंदाजे ५.५ कोटी रुपये आहे. ६ डिसेंबर २०२५ च्या मध्यरात्री ही चोरी झाली.मुंबईतील गोरेगाव येथील रहिवासी असलेले अभय कुमार जैन हे त्यांच्या मुलीसोबत एसी फर्स्ट क्लास कोच ए-१ म




धून प्रवास करत होते. ४९ आणि ५१ असे त्यांचे बर्थ क्रमांक होते. प्रवास करताना जैन यांच्याकडे दोन ट्रॉली बॅग होत्या. त्यापैकी एका ट्रॉली बॅगमध्ये ५ किलोचे सोन्याचे दागिने होते. रात्री प्रवास करताना झोपण्याआधी त्यांनी ट्रॉली बॅग लॉक करून त्यांच्या बर्थखाली ठेवली.७ डिसेंबर रोजी सकाळी ट्रेन कल्याण स्टेशनजवळ आली तेव्हा जैन यांना जाग आली, पण त्यांना सोने असलेली ट्रॉली बॅग गायब असल्याचं समजलं. त्यांनी लगेच टीटीई विक्रम यांना याबाबत कळवलं आणि रेल्वे आपत्कालीन हेल्पलाइनशी संपर्क साधला.

सोनं असलेली बॅग गायब झाल्याची घटना कल्याणजवळ उघडकीस आल्याने, जैन यांना कल्याण रेल्वे पोलिसांशी अर्थात जीआरपीशी संपर्क साधण्याचं सांगण्यात आलं. त्यानंतर कल्याणमध्येच चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.पोलिसांत तक्रार दाखल करताना जैन यांनी दागिन्यांची सविस्तर यादी, संपूर्ण माहिती पोलिसांना दिली. चोरीला गेलेली बॅग निळ्या आणि काळ्या रंगाची अमेरिकन टूरिस्टर ट्रॉली बॅग होती. त्यात सोन्याचे दागिने भरलेला एक पांढरा प्लास्टिक बॉक्स होता, त्या बॉक्समध्ये नेकलेस, मंगळसूत्र, अंगठ्या, कानातले, चेन, वाट्या आणि इतर दागिने होते. या दागिन्यांची किंमत ५.५ कोटी होती.

दागिन्यांची बॅग शोधण्यासाठी पोलिसांची तीन पथक तयार करण्यात आली. लवकरच याबाबत ठोस पुरावे मिळतील अशी आशा पोलिसांनी व्यक्त केली आहे. पोलिसांकडून रेल्वे स्थानकं, कोचमधील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत. ही चोरी सुनियोजित असून प्रवासाशी परिचित असलेल्या संघटित टोळीने ती घडवून गेल्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घटनेनंतर लांब पल्ल्याच्या गाड्यांमधील प्रवाशांच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

# पंड्याचं पहिल्यात सामन्यात धुमशान, कमबॅक करत मिळवून दिला विजय



**कटक :** कमबॅक कसे करायचे तर ते हार्दिक पंड्यासारखे. आपल्या कमबॅकच्या पहिल्याच सामन्यात हार्दिक पंड्याने धुमशान घातले. कसलीही तमा न बाळगता तुफानी फलंदाजी करत संघाला सावरलेच नाही तर धावांचाा डोंगरही उभारून दिला. हार्दिक पंड्याच्या अर्धशतकाच्या जोरावर भारताला यावेळी १७५ धावांची मजल मारता आली. या आव्हानाचा पाठलाग काढताना भारताने दक्षिण आफ्रिकेला सुरुवातीपासूनच धक्के द्यायला सुरुवात केली. हार्दिक पंड्याने तर आपल्या पहिल्या चेंडूवर विकेट मिळवत फलंदाजीनंतर गोलंदाजीतही चमक दाखवली आणि भारताच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. त्यामुळे भारताने या सामन्यात १०१ धावांनी विजय साकारता आणि मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.भारताची या सामन्यात सुरुवात चांगली झाली नाही. कारण तिसऱ्याच चेंडूवर शुभमन गिल बाद झाला. मोठे फटके मारण्याच्या नादात कर्णधार सूर्यकुमार यादवनेही आपली विकेट गमावली. सलामीवीर अभिषेक शर्मा बराच वेळ खेळपट्टीव र उभा होता खरी, पण त्यालाही मोठी खेळी साकारण्यात अपयश आले. तिलक वर्मा आणि अक्षर पटेलही जास्त काळ टिकू शकले नाहीत. भारताचा डाव अडचणीत आला होता. त्यावेळी भारतासाठी संकटमोचक ठरला तो हार्दिक पंड्या. हार्दिकने यावेळी कोणतेही दडपण घेतले नाही आणि त्याने तुफानी फटकेबाजी करायला सुरुवात केली. हार्दिकने दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांवर चौफ ेर हल्ला चढवला आणि त्यांची चांगलीच धुलाई केली.हार्दिक पंड्याने सुरुवातीपासून तुफानी फलंदाजी करत आपले अर्धशतक झळकावले. हार्दिकने या सामन्यात २८ चेंडूंत सहा चौकार आणि चार षटकारांच्या जोरावर नाबाद ५९ धावांची खेळी साकारली, हार्दिकच्या या खेळीच्या जोरावरच भारताला १७५ धावांचा डोंगर उभारता आला. भारताने आव्हानात्मक धावसंख्या उभारली होती आणि आता गोलंदाजांच्या हातात भारताचा विजय होता.भारताच्या गोलंदाजांनी पहिल्याच षटकापासून दक्षिण आफ्रिकेला धक्के द्यायला सुरुवात केली. अर्शदीप सिंगने तर दोन षटकांत क्विंटन डीकॉक आणि स्ट्रिस्टन स्टब्सला बाद केले, त्याने भारतासाठी विजयाचा दरवाजा उघडला. त्यानंतर जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती आणि हार्दिक पंड्या यांनी आपलं काम चोख बजावले आणि भारताला विजय मिळवून दिला.

## अंपायरच्या एका चुकीच्या निर्णयामुळे मॅच फिरली अनब आफ्रिकेचा झाला पराभव

**कटक :** कटकमध्ये खेळल्या गेलेल्या पहिल्या टी-२० सामन्यात टीम इंडियाने दक्षिण आफ्रिकेचा १०१ धावांनी पराभव केला. या सामन्यात वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने दोन विकेट्स घेतल्या आणि टी-२० मध्ये १०० विकेट्स पूर्ण केल्या. त्याने डेवॉल्ड ब्रेव्हिसला बाद केले, हा त्याचा १०० वा टी-२० विकेट होता. पण आता या विकेटमुळे मोठा गदारोळ निर्माण झाला आहे.या सामन्यात ब्रेव्हिस दक्षिण आफ्रिकेचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज होता. त्याने दक्षिण आफ्रिकेला सामना जिंकण्यास मदत करण्याचा प्रयत्न केला पण बुमराहच्या गोलंदाजीवर चुकीचा शॉट मारल्याने त्याची विकेट गमवावी लागली. बुमराहविरुद्धच्या ११ व्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर सूर्यकुमार यादवने त्याचा कॅच पकडला. सुरुवातीला सर्वांना वाटले की ब्रेव्हिस बाद झाला आहे, परंतु बाद झाल्यानंतर तो पॅव्हेलियनमध्ये परतताना दिसला. पंच बुमराहचा नो-बॉल तपासत होते.रिप्ले पाहण्यापूर्वीच ब्रेव्हिस डगआउटमध्ये पोहोचला होता. व्हिडिओ रिप्लेमध्ये बुमराहचा पाय क्रीजवर असल्याचे स्पष्ट दिसत होते. जर ब्रेव्हिस त्यावेळी मैदानावर असता तर चेंडू नो-बॉल घोषित झाला असता. पंचांनी रिप्ले तपासला तोपर्यंत ब्रेव्हिस आधीच डगआउटवर पोहोचला होता, ज्यामुळे त्याचा पराभव झाला. पंच सर्व बाजूंनी नो-बॉलचे मूल्यांकन करू शकले नाहीत.डेवाल्ड ब्रेव्हिस बाद झाल्याने दक्षिण



आफ्रिकेच्या विजयाच्या सर्व आशा धुळीस मिळाल्या. दक्षिण आफ्रिकेसाठी ब्रेव्हिस सर्वाधिक २२ धावा करणारा फलंदाज होता. त्यानंतर भारताच्या गोलंदाजांनी दक्षिण आफ्रिकेला फक्त १४ चेंडूत बाद केले. दक्षिण आफ्रिकेच्या संघाला १२.२ षटकांत ७४ धावांवर बाद करून १०१ धावांनी पराभव पत्करावा लागला. दक्षिण आफ्रिकेविरुद्ध टॉस गमावल्यानंतर, टीम इंडियाची नवीन बॉलसह फलंदाजी प्रभावी नव्हती. या सामन्यात संघाचे टॉप-ऑर्डर फलंदाज अपयशी ठरले, परंतु मधल्या फळीतील हार्दिक पंड्याने धमाकेदार खेळी केली आणि २८ चेंडूत नाबाद ५९ धावा केल्या. हार्दिकने चेंडूने एक विकेटही घेतली. त्याच्या प्रभावी कामगिरीसाठी त्याला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले.

## जसप्रीत बुमराने रचला महारेकॉर्ड, अशी कामगिरी करणार पहिला खेळाडू

**कटक :** जसप्रीत बुमराहसारखा गोलंदाज जगात नाही, असं म्हटलं जातं आणि त्या गोष्टीचा प्रत्यय यावेळीही आला. कारण जसप्रीत बुमराहने या सामन्यात महारेकॉर्ड आपल्या नावावर केल्याचे पाहायला मि ळाले, कारण अशी कामगिरी करणारा बुमराहा हा पहिलाच खेळाडू ठरला आहे. जसप्रीत बुमराहला गौतम गंभीर यांनी वनडे सामन्यांत खेळवले नव्हते. पण आता पहिल्या टी २० सामन्यात मात्र गंभीर यांनी बुमराहला संधी दिली. बुम राहने या संधीचे सोने केल्याचे पाहायला मिळाले. कारण यावेळी बुमराहने अशी कामगिरी करून दाखवली जी आतापर्यंत कोणालाही जमली नाही.बुमराह या साम न्यात आगीच्या गोळ्यांसारखी वेगवान गोलंदाजी करत होता. जसप्रीत बुमराहने फॉर्मात असलेला दक्षिण आफ्रिकेचा धडाकेबाज फलंदाज डेव्हाल्ड ब्रेव्हिसला बाद केले आणि भारताला सर्वात मोठे यश मिळवून दिले. कारण यावेळी ब्रेव्हिस



हा भारताच्या विजयाच्या मार्गात सर्वात मोठा अडसर ठरत होता. त्यामुळे त्याला बाद करत बुमराहने भारतासाठी विजयाचे दार किलकिले केले. बुमराहने त्यानंतर केशव महाराजलाही बाद केले आणि आपला दुसरा बळी मिळवला. बुमराहने या सामन्यात तीन षटके टाकली. या तीन षटकांत १७ धावा देत त्याने दोन बळी मिळवले. पण त्याचबरोबर बुमराहने एक सर्वात मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. बुमराहने या सामन्यात टी २० क्रिकेटमधील १०० विकेट्सचा टप्पा पार केला.

## अर्शदीप सिंगने रचला इतिहास, आतापर्यंत कोणालाच करता आली नाही

**कटक :** भारताच्या विजयात अर्शदीप सिंगने महत्वाची जबाबदारी निभावली. या सामन्यात भारताला सुयश मिळवून देताना अर्शदीपने आपल्या नावावर मोठा रेकॉर्ड रचला आहे आणि त्याने अशी कामगिरी करू दाखवली आहे की जी कोणालाही आतापर्यंत जमलेली नाही.अर्शदीप सिंगने या पहिल्या सामन्यात भारताला दुहेरी यश मिळवून दिली. आपल्या दुसऱ्याच चेंडूवर अर्शदीप सिंगने क्विंटन डीकॉकला बाद केले आणि भारताला पहिले यश मिळवून दिले. डीकॉकला यावेळी भोफळाही फोडता आला नाही. अर्शदीप सिंग फक्त एवढ्यावर थांबला नाही, तर त्याने तिसऱ्या षटकात धडाकेबाज फलंदाज स्ट्रीस्टब स्टब्जला बाद केले आणि दक्षिण आफ्रिकेचे कंबरडे मोडले. कारण अर्शदीपने दोन विकेट्स मिळवत दक्षिण आफ्रिकेची २ बाद १६ अवस्था केली होती आणि त्यानंतर भारतासाठी विजयाचा दरवाजा उघडा झाला. या सामन्यात दमदार कामगिरी करत आता अर्शदीप सिंगने एक मोठा रेकॉर्ड आपल्या नाववर केला आहे.भारताच्या संघात जसप्रीत बुमराहसारखा अव्वल गोलंदाज आहे, पण तरीही जी गोष्ट बुमराहाला जमली नाही ती गोष्ट आता अर्शदीपने करून दाखवली आहे. टी २० क्रिकेटमध्ये पहिली सहा षटके पॉवर प्लेची असतात. फक्त दोन खेळाडू सीमारेषेवर असतात आणि त्यामुळे फलंदाजांना मोठी फटकेबाजी यावेळी सहज करता येऊ शकते. पण या पॉवर प्लेमध्ये सर्वाधिक विकेट्स कमीत कमी स्ट्राइक रेट ठेवत मिळवण्याचा मान आता अर्शदीप सिंगने पटकावला आहे. जसप्रीत बुमराहने आतापर्यंत पॉवर प्लेमध्ये ३३ बळी मिळवले आहेत, तर अक्षर पटेल आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्या नावावर २१ बळी आहेत. भारताकडून सर्वाधिक बळी भुवनेश्वर कुमारने घेतले होते. भुवीच्या नावावर ४७ बळी होते, पण त्याचा स्ट्राइक रेट हा २४.५ एवढा होता, या सामन्यात अर्शदीपने ४७ बळींचा टप्पा पूर्ण केला आणि त्याचा स्ट्राइक रेट हा १५.९ असल्याचे आता समोर आले आहे. त्यामुळे भारताच्या एकाही गोलंदाजाला जी गोष्ट जमली नाही ती गोष्ट आता अर्शदीपने करून दाखवली आहे. अर्शदीप सिंगने टी २० सामन्यात ऐतिहासिक कामगिरी केल्याचे आता समोर आले आहे.



# बिग बॉसच्या घरात फुकटात नेसल्या ८०० साड्या

## स्टाइलिस्टच्या आरोपानंतर तान्याच्या श्रीमंतीवर प्रश्नचिन्ह!

**खोटारडी आहे तान्या मित्तल**

**पुणे :** 'बिग बॉस १९' च्या घरात सर्वात जास्त चर्चेत राहिलेल्या तान्या मित्तलबाबत एक मोठी बातमी समोर आली आहे. तान्या मित्तलवर पर्सनल स्टाइलिस्ट रिद्धिमा शर्मांने गंभीर आरोप केले आहेत. तान्या मित्तलने बिग बॉसच्या घरामध्ये नेसलेल्या ८०० साड्यांचा एक रुपयाही दिला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे तान्या मित्तल वादात सापडली आहे. यामुळे सोशल मीडियावर तान्या मित्तलवर नेटकऱ्यांनी राग व्यक्त केला आहे. नेटकरी तिला ट्रोल करत आहेत.

तान्या मित्तल ही बिग बॉस १९ या शोची तिसरी रनर-अप ठरली. बिग बॉसच्या घरातून बाहेर पडल्यानंतर तान्या मित्तल अडचणीत सापडली असून तिची जोरदार चर्चा होत आहे. तान्या मित्तलची पर्सनल स्टाइलिस्ट रिद्धिमा शर्मांने सोशल मीडियावर एक भलीमोठी पोस्ट केली आहे. यामध्ये तिने तान्याला अनेक महागड्या साड्या, कपडे आणि ॲक्सेसरीज पाठवल्या असल्याचे सांगितले. या सर्व गोष्टी तान्याने बिग बॉसच्या घरात घातल्या पण तिला याचा एक रुपयाही मिळाला नाही. रिद्धीमाने सांगितले की तिने स्वत: तान्याच्या सर्व कपड्यांच्या शिपिंगचा आणि पोर्टलचा खर्च दिला. ती गेल्या आठवड्यापासून तान्या आणि तिच्या टीमशी संपर्क करण्याचा प्रयत्न करते. पण याकडे दुर्लक्ष केले जात असून तिला धमकवले जात आहे. रिद्धिमाने तिच्या पोस्टमध्ये लिहिले की, 'मी नेहमीच तान्याला पाठिंबा दिला आहे. तिला महागडे कपडे पाठवले आहेत. तिला एक खास भेटवस्तू आणि पत्रही पाठवले आहे. पण तिने 'धन्यवाद' देखील म्हटले नाही. माझ्या म ेहनतीकडे दुर्लक्ष केले जात आहे. तान्या मित्तलने बिग बॉसच्या घरात ८०० हून अधिक साड्या आणल्या होत्या. त्यापैकी बहुतेक साड्या मी पाठवल्या होत्या. तान्याच्या या वागवण्यामुळे मी कठीण परिस्थितीत अडकली आहे. कारण तान्याने कपड्यांचे पैसे न दिल्यामुळे मला आर्थिक दबावाचा सामना करावा लागत आहे. तान्याच्या टीमने फक्त पैसे दिले नाहीत तर मला धमकावले आहे.'

दरम्यान, बिग बॉसच्या घरामध्ये साधेपणा आणि आध्यात्मिक प्रतिमेमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतलेल्या तान्या मित्तलवर तिच्या स्टाइलिस्टने आरोप केल्यानंतर आता सोशल मीडियावर तिच्यावर टीका केली जात आहे. नेटकरी तान्यावर संताप व्यक्त करत आहेत. नेटकऱ्यांनी तिला ट्रोल केले आहे. तान्याने रुद्धीमाने केलेल्या आरोपाचे उत्तर द्यावे अशी मागणी केली जात आहे. पण तान्या आणि तिच्या टीमकडून अद्याप काहीच उत्तर आले नाही.





## कृतिका कामराने दिली प्रेमाची कबुली..!

**मुंबई :** टिव्ही इंडस्ट्रीतील प्रसिद्ध अभिनेत्री कृतिका कामराने नुकतीच आपल्या प्रेमाची कबुली दिली आहे. ती क्रिकेट होस्ट गौरव कपूरला डेट करत आहे. दोघेही अनेक वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये आहेत. रिलेशनशिपची कबुली दिल्यावर पहिल्यादांच दोघे एकत्र स्पॉट झाले आहेत. दोघांनी पापराझींसमोर छान पोज देखील दिल्या.कृतिका कामराने ऑफ शोल्डर वेलवेट टॉप आणि निळी जीन्स परिधान केली होती. तिने मिनिमल मेकअप करून आणि मोकळे केस सोडून हा लूक पूर्ण केला होता. तर गौरव कपूरने ग्रे रंगाचे कॅज्युअल टीशर्ट परिधान केले होते. ज्यावर छान सूर्यफुलाचे चित्र होते. दोघेही एकत्र खूपच आनंदी पाहायला मिळाले. त्यांचा हा व्हिजीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. यावर नेटकऱ्यांकडून कमेंट्स, लाइक्सचा वर्षाव होत आहे.

## प्राजक्ताचा माळीचा राग अनावर, म्हणाली- 'असले उद्योग थांबवा..'

**पुणे :** मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळी कायम कोणत्या ना कोणत्या कारणामुळे चर्चेत असते. ती एक अष्टपैलू व्यक्तिमत्व आहे. तिने आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली आहे. तिचा 'फुलवंती' चित्रपट आजही खूप गाजतो. प्राजक्ताच्या सौंदर्याचे आणि तिच्या स्टाइलचे लाखो चाहते दिवाने आहेत. ती सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. तिचे फोटो, व्हिडीओ आणि कामासंबंधित पोस्ट करत राहते.

प्राजक्ता माळीचा सुंदर, पारंपरिक दागिन्यांचा ब्रँड आहे. ज्याचे ती वारंवार फोटो शेअर करते. जे सोशल मीडियावर व्हायरल होत असतात. मात्र सध्या अखचा काळ सुरू आहे. त्यामुळे AI चा वापर करून कलाकारांचे अनेक फोटो तयार केले जातात. अशाच संबंधित एक पोस्ट प्राजक्ता माळीने केली. ज्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. प्राजक्ताचा साडीतील एक फोटो AI द्वारे तयार करण्यात आला. जो सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला. मात्र फोटो पाहताच प्राजक्ता माळी चाहत्यांवर प्रचंड संतापली.

प्राजक्ता माळीचा AI फोटो तिच्या एका फॅन पेजने तयार केला होता. प्राजक्ता माळीने AI द्वारे बनवलेला फोटो इन्स्टाग्राम स्टोरीला शेअर करून त्यावर एक संदेश लिहिला होता. तिने लिहिलं की, 'तो फोटो कितीही सुंदर दिसत असला तरी... मी 'एआय' द्वारे तयार केलेल्या फोटो आणि व्हिडिओंचे कधीही कौतुक करणार नाही... माझ्या फॅन क्लब्सना आणि बाहेरच्या प्रत्येकाला माझी विनंती आहे की, हे बनवणे थांबवा...' अशा कडक शब्दात चाहत्यांना आणि फॅन पेजना विनंती केली.

AI फोटोमुळे अनेक वेळा दिशाभूल होते. तसेच या फोटोंचा चुकीचा वापर देखील केला जाऊ शकतो. त्यामुळे प्राजक्ता माळीने चाहत्यांना AI द्वारे फोटो न बनवण्याची विनंती केली आहे. प्राजक्ता माळी एक अभिनेत्री, निर्माती, व्यवसायिका, कवियत्री आहे. ती 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कॉमेडी शोचे होस्टिंग करते. चाहते तिच्या आगामी प्रोजेक्टची उत्सुकतेने वाट पाहत आहेत.

# जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिवस उत्साहात साजरा

जनसंचलन/बुलढाणा



जिल्हा अल्पसंख्याक कक्षाच्या वतीने आयोजित राष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिवस जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवारी उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे होते. यावेळी जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी राहुल पवार, प्रा. एस. पी. हिवाळे, जितेंद्र जैन, अॅड वसिम कुरेशी, फादर रजनीकांत सोनावणी, इरफान उल्ला खान, अरविंद जैतपाल, संजय जाधव, शेख चाँद शेख गुलाब, काझी रईसउदीन, विविध विभागांचे अधिकारी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. तसेच नगरपरिषद उर्दू शाळेतील विद्यार्थीनींच्या उत्कृष्ट भाषण व गीतगायनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे यांच्या हस्ते शालेय भाषण व गीतगायन स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थीनींना पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी अध्यक्षीय भाषणात बोलताना त्यांनी राष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिवस देशभरात साजरा केला जात असल्याचे नमूद करून हा दिवस आनंदाचा असून अशा उपक्रमांतून एकतेचा संदेश दिला जात असल्याचे सांगितले. अल्पसंख्याक समाजाच्या समस्या व अडचणी सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमात प्रा. एस. पी. हिवाळे, अॅड वसिम कुरेशी, फादर रजनीकांत सोनावणी, इरफान उल्ला खान, अरविंद जैतपाल, संजय जाधव, शेख चाँद शेख गुलाब, काझी रईसउदीन यांनी देखील मनोगत व्यक्त करून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अंतिम टप्यात जिल्हा व्यवस्थापकांनी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, जैन आर्थिक विकास महामंडळ आणि शिक्षणाधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या योजनांची माहिती दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी राहुल पवार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेंद्र सोभागे यांनी तर सहायक जिल्हा नियोजन अधिकारी उल्का राणे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिल्हा अल्पसंख्याक कक्षातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पत्रकार दिनानिमित्त होणार पत्रकार च्या कुटुंबाची भव्य आरोग्य तपासणी शिबिर....

जनसंचलन/बुलढाणा



पत्रकारांची सर्वात जुनी संघटना आणि मातृसंस्था म्हणून ओळखल्या जाणारे मराठी पत्रकार संघटना या संघटनेमार्फत दरवर्षी प्रमाणे विविध उपक्रम राबविल्या जातात. यावर्षी सुद्धा ६ जानेवारी पत्रकार दिनानिमित्त बुलडाणा पत्रकार भवन येथे भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.आज दि १८ डिसेंबर रोजी पत्रकार भवन येथे बुलढाणा जिल्हा पत्रकार संघ व इतर पत्रकार संघटनांच्या वतीने संयुक्त बैठक घेण्यात आली या बैठकीमध्ये भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या शिबिरामध्ये पत्रकार व त्यांचे कुटुंब या सर्वांचे आरोग्य तपासण्यात येणार आहे. या शिबिरामध्ये हृदयरोग नेत्रतज्ञ पॅथॉलॉजी अशा विविध आजारांवर तपासणी करण्यात येणार आहे. त्यानंतर औषधोपचार सुद्धा करण्यात येणार आहे. तसेच पत्रकारांच्या सुरक्षा कवच म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विमा सुद्धा यावर्षी काढण्यात येणार आहे. गेल्या वर्षी आमदार संजय गायकवाड यांनी पत्रकारांचा सुरक्षा विमा कवच काढला होता त्याचप्रमाणे यावर्षी सुद्धा पत्रकारांचा सुरक्षा विमा कवच काढण्यात येणार आहे. या बैठकीला जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत, डीजिटल मिडीया परिषदेचे जिल्हाध्यक्ष गणेश सोळंकी, राजेंद्र काळे, चंद्रकांत बर्दे, प्रा.सुभाष लहाने, जितेंद्र कायस्थ, गणेश निकम, राजेश डिडोळकर, वसिम शेख, युवराज वाघ, ब्रम्हानंद जाधव, पृथ्वीराज चव्हाण, शिवाजी मामनकर, ईसार देशमुख, गणेश सोनुने, संजय काळे, निनाजी भगत, सुरेखाताई सावळे, शरद गावंडे,रविंद्र वाघ, राम हिंगे, डॉ.भागवत वसे, सुनिल मोरे, बबन फेपाळे, दिपक मोरे, अजय राजगुरे, रहेमत अली शहा, शौकत शहा यांच्यासह जिल्हा पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य पत्रकार परिषद, असोसिएशन ऑफ स्मॉल पेपर संघटनेचे पदाधिकाऱ्यांची यावेळी उपस्थिती होती.

# जालन्यामधील वायू प्रदूषण कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना करा- पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे

वृत्तसंस्था/ मुंबई



जालना व छत्रपती संभाजीनगरमधील प्रदूषण कमी करण्यासंदर्भात पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांनी आढावा घेतला. जालनामधील हवा प्रदुषणासंदर्भात चिंता व्यक्त करून प्रदूषण कमी करण्यासाठी योग्य ती पावले उचलावीत. तसेच उच्चस्तरीय अधिकाऱ्यांनी बैठक घेऊन प्रदूषण करणाऱ्या उद्योगांविरुद्ध तातडीने कारवाई करण्याच्या सूचना पर्यावरण मंत्री मुंडे यांनी यावेळी दिल्या. जालना औद्योगिक वसाहत तसेच छत्रपती संभाजीनगरमधील वाळुंज, शेंद्रा, ऑरिक सिटी औद्योगिक वसाहतींमधील वायू व जल प्रदूषणासंदर्भात आज पर्यावरण मंत्री मुंडे यांनी मंत्रालयात बैठक घेतली. यावेळी विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंदर सिंग, सहसंचालक (हवा प्रदूषण) सतीश पडवळ यांच्यासह दोन्ही जिल्ह्यातील प्रादेशिक अधिकारी, औद्योगिक विकास महामंडळाचे व जिल्हा प्रशासनातील अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. जालना औद्योगिक वसाहतीमध्ये स्टील उद्योगामुळे हवेत धुलीकणांमुळे प्रदूषण होत आहे. यासंबंधीच्या अनेक तक्रारी आल्या आहेत. या धुलिकणांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे धुलीकणांवर नियंत्रणासाठी संबंधित कंपन्यांनी प्राथमिक हवा प्रदूषण नियंत्रण संयत्रणांमध्ये सुधारणा करून घेण्यासंबंधी त्यांना कळविण्यात यावे. जे अशी यंत्रणा उभारणार नाहीत त्यांच्याविरुद्ध कडक कारवाई करण्याचे निर्देश पर्यावरण मंत्री मुंडे यांनी यावेळी दिले. छत्रपती संभाजीनगरमधील वाळुंज औद्योगिक वसाहतीमध्ये जल प्रदूषण रोखण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया युनिट कार्यरत आहे. येथील सांडपाण्यावर १०० टक्के पुनर्वापरासाठी परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे येथे प्रक्रिया केलेले पाणी खाम नदीत न सोडता त्याचा पुनर्वापर होण्यासाठी योग्य खबरदारी घेण्यात यावी, असे निर्देश मंत्री मुंडे यांनी दिल्या. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सिंग यांनी जालना व वाळुंज येथील प्रदूषणासंबंधीची माहिती देऊन प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत माहिती दिली. जालना औद्योगिक वसाहतीमध्ये हवा प्रदूषणाची पातळी तपासण्यासाठी फिरत्या वाहनाद्वारे वायू गुणवत्ता निरीक्षण केले जात आहे. तसेच वाळुंज औद्योगिक वसाहतीमध्ये सांडपाणी प्रकल्पामध्ये प्रक्रिया केलेले सांडपाणी न पाठविणाऱ्या ५३ उद्योगांना निर्देश देण्यात आले असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

# भारतीय कला, संस्कृती आणि शिल्पपरंपरेची अपूरणीय हानी - मंत्री अॅड. आशिष शेलार

वृत्तसंस्था/ मुंबई



ख्यातनाम शिल्पकार पद्मश्री राम सुतार यांच्या निधनाने भारतीय कला, संस्कृती आणि शिल्पपरंपरेची अपूरणीय अशी हानी झाली आहे. आपल्या प्रतिभावान हातांनी त्यांनी उभारलेली असंख्य शिल्पे ही केवळ दगड-धातूतील कलाकृती नसून ती आपल्या राष्ट्राची ओळख आणि गौरव ठरली आहेत, अशा शब्दात सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या. राम सुतार यांनी आपल्या दीर्घ कलासाधनेतून भारतीय शिल्पकलेला जागतिक स्तरावर मान्यता मिळवून दिली. स्टॅच्यू ऑफ युनिटीसह त्यांच्या अनेक कलाकृतींमधून राष्ट्रभक्ती, संस्कृतीची मुळे आणि कलात्मक उत्कृष्टता यांचे दर्शन घडते. त्यांच्या निधनाने एक महान कलाकार आपल्यातून निघून गेला असला, तरी त्यांच्या कलाकृती आणि त्यांनी निर्माण केलेली प्रेरणा सदैव जिवंत राहील. या दुःखद प्रसंगी दिवंगत राम सुतार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करतो. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो, अशा शब्दात मंत्री अॅड. शेलार यांनी आपल्या शोकभावना कळविल्या आहेत.

# राजीनामा प्रज्ञा सातव यांचा, पण कोंडी सतेज पाटलांची? नंबरमुळे गेम, ठाकरेंचा फायदा होण्याची चर्चा

वृत्तसंस्था/मुंबई

गांधी कुटुंबीयांचे निकटवर्तीय राहिलेले दिवंगत राजीव सातव यांच्या पत्नी आणि काँग्रेसच्या विधान परिषदेतील आमदार प्रज्ञा सातव यांच्या राजीनाम्यामुळे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेतेपद पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. प्रज्ञा सातव यांच्या राजीनाम्यामुळे काँग्रेसचे परिषदेतील संख्याबळ आठवरून सातवर आले असल्याने विरोधी पक्षनेतेपदाच्या काँग्रेसच्या स्वप्नाला धक्का लागण्याची चिन्हे आहेत. प्रज्ञा सातव यांचा राजकारणाशी फारसा संबंध नव्हता, मात्र त्यांचे दिवंगत पती राजीव सातव हे खासदार होते व राहुल गांधी यांच्या अत्यंत निकटवर्तीयांपैकी एक म्हणून ओळखले जात. राजीव यांचा करोनाच्या साथीत अकाली मृत्यू झाल्यानंतर गांधी कुटुंबाने स्वतःहून प्रज्ञा सातव यांना विधान परिषदेवर पाठवले. वास्तविक पाहता, काँग्रेसमधील अनेक होतकरूंनी तेव्हा या जागेसाठी आग्रह धरला होता, मात्र सातव यांचे नाव येताच गांधी कुटुंबाच्या निकटवर्तीय म्हणून काँग्रेसच्या सगळ्याच गटातटांमध्ये शांतता पसरली होती. आता गांधी कुटुंबाच्या निकटवर्तीयानेच राजीनामा देत भाजपची वाट धरल्याने काँग्रेस पक्षातले नक्की कोण आणि किती जण गांधी कुटुंबाशी किंवा काँग्रेसशी एकनिष्ठ आहेत याचा शोध घेणे गरजेचे आहे, असे उद्विग्न उद्गार काँग्रेसमधील एका ज्येष्ठ नेत्याने ङ्गमटाफ्शी बोलताना काढले. राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात विरोधी पक्षनेतेपदाचा मुद्दा चांगलाच गाजला होता. विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडे द्यावे आणि विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपद आपले संख्याबळ शिवसेनेपेक्षा एकाने अधिक असल्याने आपल्याला मिळावे, असा काँग्रेस पक्षाचा दावा होता. महायुतीचे सरकार आल्यापासूनच्या प्रत्येक अधिवेशनामध्ये महाविकास आघाडीचे नेते विरोधी पक्षनेतेपदासाठी आग्रही आहेत. सातव यांच्या राजीनाम्यापूर्वी विधान परिषदेत काँग्रेसचे एकूण आठ आमदार कार्यरत होते. तर, अंबादास दानवे यांचा कार्यकाळ संपल्यानंतर शिवसेना-उबाठाचे सहा आमदार आहेत. हिंगोली जिल्ह्यातील काँग्रेसच्या आमदार प्रज्ञा सातव आणि सोलापूर दक्षिणचे काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने यांनी समर्थकांसह गुरुवारी भाजपमध्ये प्रवेश केला. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजप प्रदेश कार्यालयात हे पक्षप्रवेश पार पडले. या वेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, ज्येष्ठ नेते कृपाशंकर सिंह, भाजप माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन उपस्थित होते. प्रज्ञा सातव यांचा आमदारकीचा कार्यकाळ २७ जुलै २०३० रोजी संपणार होता; पण तत्पूर्वीच त्यांनी



राजीनामा दिल्याने राजकीय वर्तुळातही आश्चर्य व्यक्त केले जात आहे. सध्या विधान परिषदेत काँग्रेसकडून विरोधी पक्षनेतेपदासाठी सतेज पाटील यांचे नाव चर्चेत होते. मात्र, आता सातव यांच्या राजीनाम्यामुळे हे नाव मागे जाऊ शकते. पाटील यांच्यासह काँग्रेसच्या इतर आमदारांमध्ये भाई जगताप, जयंत आसगावकर, राजेश राठोड, धीरज लिंगाडे आणि अभिजित वंजारी; तसेच सहयोगी सदस्य म्हणून सुधाकर अडबाले असे सात आमदार कार्यरत आहेत. शिवसेना (उबाठा) पक्षात उद्धव ठाकरे, अनिल परब, सुनील शिंदे, मिलिंद नार्वेकर, जगन्नाथ अभ्यंकर आणि सचिन अहिर हे विधान परिषदेत आमदार आहेत. त्यामुळे आता विरोधी पक्षनेतेपदाची माळ कोणाच्या गळ्यात पडते, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

## पिंपरी चिंचवड महापालिका मालमत्ता सर्वेक्षणातील अनियमितता चौकशीअंती देयक देणार- उद्योगमंत्री उदय सामंत

वृत्तसंस्था/ नागपूर



पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यासाठी नेमण्यात आलेल्या स्थापत्य कन्सल्टन्सी इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने केलेल्या कामातील अनियमिततेची चौकशी करूनच कंपनीस उर्वरित देयक दिले जाईल, असे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत लक्षवेधीच्या उत्तरात सांगितले.

सदस्य अमित गोरखे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत स्थापत्य कन्सल्टंट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या खासगी ठेकेदाराकडून शहरातील सर्व मालमत्ताचे सर्वेक्षण या संदर्भात उपस्थित केलेल्या लक्षवेधीच्या उत्तरात उद्योगमंत्री उदय सामंत यांनी ही माहिती दिली. या लक्षवेधीच्या चर्चेत सदस्य उमाताई खापरे यांनी उपप्रश्न विचारत सहभाग घेतला.

मंत्री श्री. सामंत यांनी सांगितले, ५ लाख ८० हजार मालमत्तेच्या सर्वेक्षणासाठी कंपनीस ४७ कोटी ९५ लाखाचे काम देण्यात आले. तथापि ३ लाख ७० हजार २१३ इतक्या नवीन मालमत्ता आढळून आल्या. त्यासाठी २९ कोटी ९ लाख ८७ हजार ४१८ इतक्या वाढीव खर्चास महापालिकेने मान्यता दिली. यामधील केवळ १२ कोटी रुपये कंपनीस अदा करण्यात आले आहे. सर्वेक्षणादरम्यान काही मालमत्तांचा प्रकार रेसिडेन्शिअल वरून कमर्शियल असा बदल करण्यात आल्याचे आढळले. या बदलांमधील काही अनियमितताबाबत सध्या आयुक्त पदाचा कार्यभार सांभाळणाऱ्या अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करून संबंधित कंपनीला उर्वरित देयक अदा केले जाईल, असे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधान परिषदेत लक्षवेधीच्या उत्तरात सांगितले.

आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणूक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३११९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

(गुंतवणूक रक्कम: ५०० ते ५०००)

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८